# Washim District Police

**Nature of Work** :- **Arresting Gamblers**

**Police Station** :- **SDPO Mangrulpir**

**Date of Good Work done** :- **22/01/2023**

**Brief of the work done :-**

जुगार अड्डयावरील छाप्यात 20 जुगाऱ्याविरोधात कारवाई ; 03 लाखांचा मुद्देमाल जप्त.

## जुगार अड्ड्यावरील छाप्यात तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

### वीस जुगाऱ्यांविरुद्ध कारवाई; राजाकिन्ही येथील घटना

**वाशीम**, दि. २१ (प्रतिनिधी)



मंगरुळपीर पोलीस स्टेशनच्या हद्दीत राजाकिन्ही येथे पोलिसांनी २० जानेवारी रोजी जुगार अड्ड्यावर छापा मारुन तीन लाखांचा मुद्देमाल जप्त करत वीस जुगाऱ्यांविरुध्द कारवाई केली. ही कारवाई मंगरुळपीर उपविभागीय पोलीस अधिकारी व मंगरुळपीर पोलिसांच्या संयुक्त पथकाने केली असून या कारवाईमुळे जुगाऱ्यांसोबचत अवैध व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत.

जिल्ह्यातील अवैध धंद्याना आवर घालण्याच्या सुचना जिल्हा पोलीस अधीक्षकांनी दिल्या. त्यानुसार हरकतीत आलेल्या पोलीस प्रशासनाकडून कारवायांचा सपाटा सुरु आहे. अशात राजाकिनही येथे पैशांच्या हारजितीवर मोठ्या प्रमाणात जुगार खेळल्या जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी शुक्रवारी राजाकिन्ही येथील आठवडीबाजारातील जुगार अड्ड्यावर छापा मारला. यावेळी पोलिसांनी वीस जुगाऱ्यांच्या ताब्यातून ४७ हजार ४३० रुपये रोख, ६१ हजार रुपये किंमतीचे चार मोबाईल व २ लाखाच्या चार दुचाक्या असा एकून ३ लाख ८ हजार ४३० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी जगदीश पांडे यांचे सोबत एपीआय मंजुषा मोरे, पीएसआय माणिक चव्हाण, इस्माईल कालीवाले, रामेश्वर राऊत, मंगेश गादेकर, रुपाली वाकोडे यांनी पार पाडली.